NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक २५.११.२०२६ बुधवार

(कामगिरी)

१) एमआयडीसी पोलीसांची कामगिरी :– हद्दपार आरोपी महीलेस अटक.

दिनांक २४.११.२०२६ चे २०.३० वा. चे सुमारास, एमआयडीसी पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत हद्दपार, हिस्ट्रीशीटर व रेकॉर्डवरील आरोपींचे शोधार्थ पेट्रोलींग रात्रगस्त करीत असता, त्यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्ददीत, ईसासनी वस्ती, शांतीनगर, एमआयडीसी, नागपुर येथे राहणारी हद्दपार आरोपी महीला नामे कौशल्या कोचे ही आपले राहते घरी आली आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे प्राप्त वर्णनाची एक महीला दिसुन आली. तीला ताब्यात घेवुन पंचासमक्ष तीचे नाव पत्ता विचारले असता, तीने तीचे नाव कौशल्या रामपाल कोचे, वय ५७ वर्षे, रा. घटनास्थळ असे सांगीतले. तीला पोलीस ठाणे येथे आणुन तीचा गुन्हे अभिलेख तपासला असता, तीला पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०३/२०२६ दिनांक २०.०८.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी महीला ही हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत, कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व तीने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे एमआयडीसी येथे महीला आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. ऋषीकेश सिंगारेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. १), मा. श्री. यशवंत नलावडे, सहा. पोलीस आयुक्त (एमआयडीसी विभाग), मा. श्री. बाबुराव राऊत (वपोनि.) यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि. शशिकांत तायडे, पोउपनि. पंकज सयाम, पोहवा. प्रविण फलके, प्रमोद सोनोने व विक्रांत देशमुख यांनी केली.

२) नविन कामठी पोलीसांची कामगिरी :– एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक २४.११.२०२६ चे ०४.४५ वा. ते ०६.३० वा. चे दरम्यान, नविन कामठी पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, जबलपूर हायवे वरील लिहीगाव अंडरपास जवळ एका काळ्या रंगाच्या ऑटोमध्ये दोन ईसम एम.डी पावडर विक्रीकरीता बसून आहेत. अशा माहितीवरून नमुद ठिकाणी जावून पाहणी केली असता, तेथे एक काळ्या रंगाचा ऑटो क्र. एम.एच ४९ ए.आर ७४५३ उभा असलेला व त्यामध्ये दोन इसम मिळून आले. पंचासमक्ष त्यांना त्यांची नावे व पत्ता विचारले असता, त्यांनी १) सोहेल शेख शकील अहमद, वय २६ वर्षे, रा. चॉदणी चौक, हसनबाग, नंदनवन, नागपूर २) शेख रजाक शेख रियाज, वय २६ वर्षे, रा. हसनबाग, गल्ली नं. ०२, कब्रस्तान जवळ, नंदनवन, नागपुर असे सांगीतले. त्यांचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन, त्यांचे ताब्यातील ऑटो व अंगझडती घेतली असता, सोहेल शेख

याचे ताब्यात एका झिपलॉक पन्नीत एकुण ४.५४ ग्रॅम एम.डी. पावडर मिळुन आली. आरोपींना अधिक विचारपुस केली असता, त्यांनी एम.डी. पावडर विक्रीकरीता थांबले असल्याचे सांगीतले. दोन्ही आरोपींचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०४ मोबाईल व एक बजाज कंपनीचा ऑटो असा एकुण १,२७,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे नविन कामठी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. रमेश धुमाळ, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ६), मा. श्री. सत्यविर बंडीवार, सहा. पोलीस आयुक्त (अती.कार्य.कामठी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. महेश आंधळे, रामेश्वर कायंदे, पोउपनि. योगेश नाल्टे, सफौ. किशोर महंत, पोअं. विवेक दोरशेटवार, सुरज ठाकुर, आशिष बागडे आणि तुषार यांनी केली.



(गुन्हे)

<u>पोलीस ठाणे हुडकेश्वर :— गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>

दिनांक २४.११.२०२६ चे ०८.३० वा. ते ०९.०० वा. चे दरम्यान, फिर्यादीचे पती नामे लक्ष्मण भरतराम आगरे, वय ४९ वर्षे, रा. प्लॉट नं. ८१, किर्तीधर सोसायटी, सर्जु टाऊन, वाठोडा, नागपूर हे त्यांची होंडा शाईन दुचाकी क्र. एम.एच ४९ ए.व्ही ६५६२ ने राहते घरून, विहीरगांव उमरेड रोड येथील साईडवर फर्निचरचे काम करण्यासाठी जात असता, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, पंचकृपा नाश्ता पॉईंट समोर, विहीरगांव, उमरेड रोड येथे एका अज्ञात चारचाकी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे पतीचे दुचाकीला धडक दिल्याने, फिर्यादीचे पती दुचाकीसह खाली पडुन गंभीर जखमी झाले. आरोपी वाहनचालक अपघात करून, घटनास्थळावरून पळुन गेला. गंभीर जखमी फिर्यादीचे पतीला बेशुध्द अवस्थेत उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल, ट्रॉमा सेंटर येथे दाखल करण्यात आले आहे. फिर्यादीचे पतीची प्रकृती गंभीर असुन, त्यांचेवर उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी सौ. पिंकी लक्ष्मण आगरे, वय ४३ वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे सफौ. माधव सिरसाम यांनी अज्ञात वाहन चालक आरोपीविरूध्द कलम २८१, १२५(अ), १२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यु)

पोलीस ठाणे गणेशपेठ :– दिनांक २४.११.२०२६ चे ०९.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत, लोहापुल जवळील, मेट्रोपुलाखालील कबाडीचे दुकानासमोर, नाल्याचे पाण्यामध्ये एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ५० ते ५५ वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आले. त्यांना फायरब्रिगेडच्या सहाय्याने पाण्याबाहेर काढुन उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाचे वर्णन–रंग निमगोरा, बांधा मजबुत, उंची ६ फुट, अंगात राखाडी रंगाची गोल गळ्याची हाफ टि–शर्ट व काळ्या रंगाचा लोवर घातलेला आहे. डोक्याचे केस काळे–पांढरे, दाढी वाढलेली काळी–पांढरी, उजव्या हातात स्टिलचा कडा, कानात बाली व हातावर देवीचे गोंदण तसेच, डाव्या हातावर नांव लिहीलेले असुन ते अस्पष्ट दिसत आहे. नमुद ईसम हा भंगार सामान जमा करून, फिर्यादी यांचे दुकानात विक्री करून, आपला उदरनिर्वाह करीत होता व दारू पिण्याचे सवयीचा तसेच, कुठेही राहत होता. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे गणेशपेठ येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी अब्दुल सईद अब्दुल हफीज, वय ६५ वर्षे, रा. नयापुरा, जिलानी गॅरेज जवळ, गणेशपेठ, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे मपोउपनि. नयना माहुलकर यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

(मिसींग)

१) पोलीस ठाणे अजनी :– फिर्यादी सौ. याशिका विल्यम ॲन्थोनी, वय २६ वर्षे, रा. फ्लॅट नं. १०१, मयुरी पॅलेस, नाईक नगर, अजनी, नागपूर यांनी पोलीस ठाणे अजनी येथे तक्रार दिली की, त्यांचे पती नामे विल्यम जयराज ॲन्थोनी, वय ३९ वर्षे हे दिनांक ३१.१०.२०२६ चे १०.३० वा. पासुन पोलीस ठाणे अजनी हद्दीतील आपले राहते घरून त्यांची ग्रे रंगाची मोपेड क्र. एम.एच ४९ बि.ई ४४८३ ने कुठेतरी निघुन गेले असुन, अद्याप बेपत्ता आहेत. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आले नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे अजनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **बेपत्ता व्यक्तीचे वर्णन–** रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–मध्यम, उंची–५ फुट ७ इंच, डोळे–काळे, केस–काळे, अंगात– निळ्या रंगाचा फुलबाहीचा शर्ट व निळ्या रंगाचा जिन्सपॅन्ट घातलेले आहे. भाषा– मराठी, हिंदी बोलतात. ओळख– डोळ्यावर चष्मा लावतात.

२) पोलीस ठाणे पारडी :– फिर्यादी सौ. बबीता बबलु परी, वय ३९ वर्षे, रा. अब्बुमियॉ नगर, गणपती सहारे यांचे घरी किरायाने, काच कंपनीचे बाजुला, भांडेवाडी, नागपूर यांनी पोलीस ठाणे पारडी येथे तक्रार दिली की, त्यांचे पती नामे बबलु भगवान पुरी, वय ४२ वर्षे हे दिनांक ३१.१०.२०२६ चे ०६.३० वा. पासुन पोलीस ठाणे पारडी हद्दीतील हनुमान मंदीर, पारडी येथुन कुठेतरी निघुन गेले असुन, अद्याप बेपत्ता आहेत. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आले नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे पारडी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **बेपत्ता व्यक्तीचे वर्णन–** रंग–गोरा, चेहरा–गोल, बांधा–मध्यम, उंची–५ फुट १ इंच, डोळे–काळे, केस–काळे, अंगात– पांढऱ्या रंगाची टि–शर्ट व पॅन्ट घातलेले आहे. भाषा– मराठी, हिंदी बोलतात. ओळख– उजव्या हाताचे मनगटाजवळ 'बबलु गोस्वामी' नांव गोंदलेले आहे.

३) पोलीस ठाणे पाचपावली :– फिर्यादी सौ. किर्ती पवन तांबे, वय ३९ वर्षे, रा. पाचपावली, ठक्करग्राम, स्विपर कॉलोनी, नागपूर यांनी पोलीस ठाणे पाचपावली येथे तक्रार दिली की, त्यांची नातेवाईक मुलगी नामे मुस्कान भरत मधुमटके, वय २० वर्षे, रा. वरीलप्रमाणे ही दिनांक २०.११.२०२६ चे १०.०० वा. पासुन पोलीस ठाणे पाचपावली हद्दीतील फिर्यादीचे राहते घरून बेपत्ता झाली आहे. तीचा शोध घेतला असता, मिळून आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने तीला फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे पाचपावली येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **बेपत्ता व्यक्तीचे वर्णन–** रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–मजबुत, उंची–५ फुट ६ इंच, केस–काळे लांब, अंगात– निळ्या रंगाचा टॉप व गोल्डन रंगाची लॅगीन तसेच काळ्या रंगाचा दुपट्टा घातलेले आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलते.


विल्यम


बबलु


मुस्कान

(ईतर)

आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

अ	कोर्टाचे नाव	केस क्र.	कलम	आरोपीचे नाव व पत्ता	पेशी तारीख
१.	मा. १२ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर.	३०४०१३५ /१९९९	कलम ४२०, ४६७, ४६८, ३४ भा.दं.वि.	१) रितुराज गोकुलप्रसाद त्रिपाठी, रा. नविन जयताळा, रमाबाई आंबेडकर नगर, नागपुर. २) सिध्दार्थ गोपीचंदजी वानखेडे, रा. शंकरशाही मठाजवळ, भांडेप्लॉट, सक्करदरा, नागपुर. ३) वामन अन्नाजी मानेकर, रा. प्लॉट नं. ४१३, तिरंगा चौक, नागपुर. ४) हरीष जनार्दन नागदिवे, रा. सेंट जोसेफ हायस्कुल जवळ, जयताळा, नागपुर.	३०.११.२०२६
२	मा. १२ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर.	३०४३६८/ २००७	कलम ३९२, ३४ भा.दं.वि.	१) अनिल सिताराम बगदाते, रा. भिमचौक, बबलु पाटील चे घराचे मागे, टेकडी, अंबाझरी, नागपुर. २) किशोर जिवन नंदनवार, रा. कोष्टीपुरा मोहल्ला, हिंगणा, नागपुर.	३०.११.२०२६

३	मा. तदर्थ जिल्हा न्यायाधीश– ४, तथा अती. सत्र न्यायाधिश साहेब, नागपुर.	७२०/ २०२४	कलम ३५३, ३३८, १८६ भा.दं.वि.	दिलीप विठ्ठल पाटील, वय ३२ वर्षे, रा. धरमपेठ, नागपुर.	१५.१२.२०२६

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.